सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

शासकीय अध्यापक महाविद्यालय
(सी.टी.ई), यवतमाळ

वाग्यज्ञ

वार्षिकांक २०१६-२०१८

यवतमाळ

सा विद्या या विमुक्तये



प्रा.डॉ.दादाराव इंगोले स, प्रा.डॉ.विठ्ठलराव घोनशेटवाड , प्रा.डॉ.छाया महाले, प्रा.डॉ.रेखा उपाध्ये,
प्राचार्य डॉ.सीमा लिंगायत, प्रा.डॉ.सुषमा गणोजे, प्रा.सुनिता कुळसंगे, प्रा.प्रतिमा थुल.
महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक वर्ग

पहिली रांग : लखन चव्हाण (द्वितीय वर्ष), शुभम चव्हाण (छात्र संसद), मसुद खान, निलेश राठोड ,
दुसरी रांग : प्रा.डॉ.इंगोले सर, प्रा.डॉ.घोनशेटवाड सर, प्रा.डॉ.महाले मॅडम, प्रा.डॉ.उपाध्ये मॅडम, प्राचार्य डॉ.लिंगायत मॅडम
प्रा.डॉ.गणोजे मॅडम, प्रा.कुळसंगे मॅडम, प्रा.थुल मॅडम
बसलेले विद्यार्थी : हेमलता कांबळे, सुचिता डवले, सुवर्णा पारखी, पुनम खडसे, प्रियदर्शनी तायडे, मनिषा गोटे, रुची कदम
प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग व सत्र : २०१६ - १८ द्वितीय वर्षाचे छात्र संसद

पहिली रांग–अरविंद वासेकर, जाधवबाई, शुभम चव्हाण, मसुद खान, निलेश राठोड, लखन चव्हाण, शिवम राठोड,
दुसरी रांग– किशोर, शेंडे, ईश्वर भोयर, डॉ.घोनशटेवाड सर, डॉ.इंगोले सर, डॉ.महाले मॅडम, डॉ.उपाध्ये मॅडम,
प्राचार्य डॉ. सीमा लिंगायत मॅडम, डॉ. गणोजे मॅडम, प्रा.कुळसंगे मॅडम, प्रा.थुल मॅडम, ग्रंथपाल गावंडे मॅडम, पटेल बाबु,
खाली बसलेले – कु.मनिषा बोबडे, कु.हेमलता कांबळे, कु.सुचिता डवले,
कु.सुवर्णा पारखी, कु.पुनम, खडसे, कु.प्रिया तायडे, कु.मनिषा गोटे, कु.रुचि कदम. सत्र २०१६-१८

मनोगत

२९ नोव्हेंबर २०१६ हा दिवस माझ्या आयुष्यातील अतिशय महत्वाचा दिवस. जीवनाला वेगळे वळण देणारा. ह्याच दिवशी आपल्या महाविद्यालयाचा महत्वाचा घटक म्हणुन माझे पदार्पण झाले. याआधी ह्याच महाविद्यालयात १९.११.१९९० साली मी अधिव्याख्याता या पदावर रुजु झाले. या महाविद्यालयातील एकुण २७ वर्षाचा माझा प्रवास अतिशय लक्षात ठेवण्यासारखा आहे.

महाविद्यालयाचा वार्षिकांक आपल्यासमोर सादर होत आहे व या निमित्याने आपणास संदेश देवु इच्छिते की, आपण आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक राहा. जे जे चांगले आपणाजवळ आहे ते ते सर्वांना देण्याचा प्रयत्न करीत राहा. ज्ञान दिल्याने वाढते. ते वाढवित राहा सर्व छात्राध्यापकांना भावी उज्वल भविष्यासाठी सदिच्छा देऊन सुयश चिंतिते.

डॉ.सीमा सुरेश लिंगायत - प्राचार्य

शासकीय अध्यापक महाविद्यालय (सी.टी.ई.) यवतमाळ

शैक्षणिक स

ओळख स्वत:ची
मा.माधुरीताई
प्राच

छात्र संस
प्राचार्य डॉ.लिं

माजी विद्यार्थी मेळा
पदवी प्रमा

नियमित बि.एड. चे प्रशिक्षणार्थी रक्तदान करतांना

द्वितीय वर्ष (सत्र २०१७-१८) सांस्कृतिक कार्यक्रमाच्या
उद्घाटन प्रसंगी दिपप्रज्वलन करतांना मा.श्री.नरेंद्रजी फुलझेले
निवासी उपजिल्हाधिकारी यवतमाळ

यं.च.म.मु.वि.नाशिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम सत्र
२०१६-१८ बॅचचे प्रशिक्षणार्थी प्राचार्य व
प्राध्यापक वर्गासोबत.

क्रिडा

नियमित बि.एड. चे प्रशिक्षणार्थी योगा

सत्र २०१६-१७विशाखा समिती आयो
"कामाच्या ठिकाणी होणारा महिलांवरील
कार्यशाळेप्रसंगी मार्गदर्शन करतांना ॲड.निर्

पाथ्रटदेवी येथे सामाजिक सहभा

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती का
भाषण करतांना प्राचार्य डॉ.लिंगा

शासकीय अध्यापक महाविद्यालय
(सी.टी.ई), यवतमाळ

वाग्यज्ञ

वार्षिकांक २०१६-२०१८

मुख्य संपादक व प्रकाशक

डॉ. सिमा लिंगायत
प्राचार्य

कार्यकारी संपादक

प्रा.डॉ.रेखा उपाध्ये
प्राध्यापक

प्रशिक्षणार्थी

श्री.राहुल गेडाम
सदस्य सचिव

कु.मनिषा गोठे
द्वितीय वर्ष सदस्य

मसुद अहमद खान
खलिल उर रहेमान खान
सदस्य

कु.निकीता जाठे
प्रथम वर्ष सदस्य

शासकीय अध्यापक महाविद्यालय, (सी.टी.ई) यवतमाळ
प्राचार्य, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी

डॉ.सिमा लिंगायत
प्राचार्य

डॉ.रेखा उपाध्ये
सहाय्यक प्राध्यापक

डॉ.सुषमा गणोजे
सहयोगी प्राध्यापक

डॉ.छाया महाले
सहाय्यक प्राध्यापक

डॉ.विठ्ठल घोनशेटवाड
सहाय्यक प्राध्यापक

डॉ.दादाराव इंगोले
सहाय्यक प्राध्यापक

प्रा.सुनिता कुळसंगे
(कला शिक्षक)

प्रा.प्रतिमा थुल
(क्रीडा शिक्षक)

कु.हर्षलता गावंडे
(ग्रंथपाल)

श्री.ईश्वर भोयर
वसतीगृह अधिक्षक

श्री.प्रविण गुजर
मुख्य लिपीक

श्री.चंद्रशेखर पटेल
वरिष्ठ लिपीक

श्री. सिध्दार्थ चिंडाले
कनिष्ठ लिपीक

श्री.किशोर शेंडे
प्रयोगशाळा सहाय्यक

श्रीमती.रुक्माबाई जाधव
शिपाई

श्रीमती.पार्वतीबाई पाटे
शिपाई

श्री.दत्ता वाघमारे
शिपाई

श्रीमती.भाग्यश्री देवगडे
शिपाई

श्री.अरविंद दासेकर
शिपाई

श्री.राजेश राजबाडे
शिपाई

श्रीमती.मैमुना पठान
सफाई कामगार

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

शासकीय अध्यापक महाविद्यालय (सी.टी.ई), यवतमाळ

बाग्यज्ञ

वार्षिकांक सत्र २०१६-२०१८

स्थापना : इ.स. १९६८

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

एन.सी.टी.ई. मान्यताप्राप्त

नॅक द्वारा बी ++ दर्जा प्राप्त

यवतमाळ

सा विद्या या विमुक्तये

- पत्र व्यवहाराचा पत्ता -

प्राचार्य

शासकीय अध्यापक महाविद्यालय (सी.टी.ई.), यवतमाळ

गोधणी रोड, यवतमाळ - ४४५ ००१

दुरध्वनी क्रमांक : (०७२३२) २४०५३९ (कार्यालय)

(०७२३२) २५२७३२ (फॅक्स)

वेब साईट : www.govt-bed-ytl.org

ई-मेल : yavatmal1968@gmail.com

शैक्षा

ओळख स्व
मा.माधु

छा
प्राचार्य

माजी विद्या
पद

* संपादकीय *

शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ चा वार्षिकांक वाग्यज्ञ आपल्या हाती देतांना अत्यंत आनंद प्राध्यापक व प्रशिक्षणार्थ्यांचे विचार या अंकाद्वारे मांडण्यात आले आहेत. भावी शिक्षकांची वैचारिक जाण किती समृ या अकांतील साहित्यातुन निदर्शनास येते. या वार्षिकांक निर्मितीसाठी वार्षिकांक सचिव राहुल गेडाम तसेच मंडळातील सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले आहे.त्याच प्रमाणे शासकीय अध्यापक महाविद्यालयातील प्राध्याप कार्यालयीन कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य ह्या वार्षिकांकासाठी लाभले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या व आमचे प्रेरणास्थान डॉ.सिमा लिंगायत यांनी वार्षिकांक तयार होत असता मार्गदर्शन केल्यानेच हा अंक आकारास येऊ शकला.

वार्षिकांक निर्मितीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केलेल्या सर्वांचीच मी आभारी आहे.

प्रा.डॉ.रेखा उपाध्ये
सहाय्यक प्राध्यापक,
शासकीय अध्यापक महावि
यवतमाळ

* वार्षिकांकातील विविध लेख व इतर मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही.

वार्षिकांक सचिवाचे मनोगत

विद्यार्थी मित्रांनो आपल्या शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ येथील शैक्षणिक सत्र २० महाविद्यालयीन उपक्रमांतर्गत छात्र संसदेतील वार्षिकांक सचिव पदासाठी माझी निवड झाली आणि 'हर्षोल्हास दाटला' तो याचसाठी कि, महाविद्यालीन प्रत्येक हृदयीच्या वाङ्मय विश्वातला मुर्त ठेवा 'वाग्यज्ञ' रुपाने बहिर्मु आणि त्या अनुषंगाने कार्य करणे हे मला माझा मान वाढल्या सारखे वाटते.

महाविद्यालयात विविध उपक्रमातुन प्रकर्षाने प्रकटीत होतांना त्यामध्ये खुप उत्सुकता वाटत असते. य मोठा वाटा उचलतांना नव्याने बळकटी प्रदान करुन ते वास्तवात उतरावे यासाठी या सत्रातल्या वार्षिकांकार पुढाकार घेत आहे आणि त्यासाठी आपल्या प्रतिसादाबद्दल ऋण व्यक्त करतो.

धन्यवाद!

राहुल विठ्ठलरा
वार्षिकांक स

प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल व कर्मचारी वृंद

प्राचार्य

*	डॉ.सिमा सुरेश लिंगायत	:	एम.ए.(राज्यशास्त्र,इतिहास,अर्थशास्त्र), एम.एड,सेट (शिक्षणशास्त्र),पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)

प्राध्यापक वर्ग

*	प्रा.डॉ. रेखा मनोहर उपाध्ये	:	एम.ए. (इतिहास) एम.एड्, एम.ए. (विषय संप्रेषण) पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)
*	प्रा.डॉ. सुषमा मुकुंद गणोजे	:	एम.एस्सी. (रसायन) एम.एड्. एम.ए. (विषय संप्रेषण) सेट (शिक्षण), पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)
*	प्रा.डॉ. विठ्ठल गोपाळराव घोनशेटवाड		एम.एससी (गणित), एम.एड्., एम.ए. (विषय संप्रेषण) सेट (शिक्षणशास्त्र) पीएच.डी. (शिक्षणशास्त्र) डी.एस.एम.
*	प्रा.डॉ.छाया दिलीप महाले	:	एम.कॉम, एम.फिल,एम.ए.(अर्थ),एम.एड्, सेट (शिक्षणशास्त्र) एम.ए. (मराठी), नेट (मराठी) पीएच.डी.(मराठी साहित्य)
*	प्रा.डॉ.दादाराव भोमाजी इंगोले	:	एम.ए.(भूगोल), एम.एड्. डी.एस.एम,पी.एच.डी. (शिक्षणशास्त्र)
*	प्रा. सुनिता कुळसंगे(कला शिक्षक)	:	एम.ए.(संगीत),बी.एड्. संगीत विशारद
*	प्रा. प्रतिमा थूल (क्रीडा शिक्षक)	:	एम.पी.एड्.
*	कु. हर्षलता गावंडे (ग्रंथपाल)	:	बी.ए.,बी.लिब, एम.लीब, एम.एस.सी.आय.टी.

कार्यालयीन कर्मचारी

*	श्री. आय.पी.भोयर	:	वसतिगृह अधिक्षक
*	श्री. पि.डी.गुजर	:	मुख्य लिपीक
*	श्री. सि.एम.पटेल	:	वरिष्ठ लिपीक
*	श्री. एस.बी. चिन्डाले	:	कनिष्ठ लिपीक.
*	श्री. के. डब्ल्यु. शेंडे	:	प्रयोगशाळा सहाय्यक

चतुर्थश्रेणी कर्मचारी

	श्रीमती.आर.बी.जाधव	:	शिपाई
	श्रीमती पि.बी.पाटे	:	शिपाई
	श्रीमती बि.जी.देवगडे	:	शिपाई
	श्री. डि.यु. वाघमारे	:	शिपाई
	श्री. अे. जी. वासेकर	:	शिपाई
	श्री. राजेश राजवाडे	:	शिपाई

घाटी कर्मचारी

	मैमुना पठान	:	सफाई कामगार
	श्री.मस्के	:	चौकीदार

अनुक्रमणिका

१)	संस्थेचा अहवाल	.....	०१
२)	छात्र प्रमुखाचा अहवाल	.....	०३
३)	निरोप, स्वागत व अभिनंदन	.....	०४
४)	विशेष उल्लेखनिय कार्य	.....	६ ते ८
५)	लेख व कविता	.....	९ ते २
६)	विविध विभागीय अहवाल	.....	२६ ते ४
७)	प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी नांव व पत्ता	.....	४३
८)	प्रशिक्षणार्थ्यांचे नांव व पत्ता	.....	४४ ते ४

संस्थेचा अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ हे शहरातील एक जुने व प्रसिद्ध अध्यापक महाविद्यालय असुन याची स्थापना १५ जुन १९६८ ला झाली. याठिकाणी अविरतपणे शिक्षक प्रशिक्षणाचे कार्य चालत आहे. यापुर्वी १९६८ साली शासन निर्णयाद्वारे अमरावती येथील शासकीय मुलींचे अध्यापक विद्यालय बंद होऊन ते शासकीय अध्यापक महाविद्यालय म्हणुन यवतमाळ येथे स्थानांतरित झाले. सन १९९७ - ९८ मध्ये या महाविद्यालयाचे उन्नयनीकरण होऊन त्याचे रुपांतर शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयात (सी.टी.ई) झाले सध्या शिक्षक प्रशिक्षणाचे महत्वाचे कार्य महाविद्यालयात सुरु आहे. तसेच मुक्त विद्यापीठाचे बी.एड.सुद्धा सध्या महाविद्यालयात सुरु आहे.

आज महाविद्यालयाच्या आराखड्यानुसार महाविद्यालयाची प्रशासकीय इमारत, कार्यशाळा इमारत, वर्ग - १ अधिकाऱ्याचे निवासस्थान, अद्ययावत असे दोन व्याख्यान कक्ष व ग्रथांलय इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे. ८० मुलींची क्षमता असणाऱ्या मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम पुर्ण झाले आहे. वसतीगृह अधिक्षक म्हणुन श्री.ईश्वर भोयर हे काम पाहतात. ८० मुलांची क्षमता असणाऱ्या वसतीगृह इमारतीचे बांधकाम अंतिम टप्यात आहे.

महाविद्यालयात संगणक प्रयोगशाळेत २ संगणक संच बसविण्यात आले आहेत. २ लॅपटॉप खरेदी करुन प्राध्यापकांना वितरीत करण्यात आले आहेत. महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीसाठी बायोमॅट्रीक उपकरण आहे .

या महाविद्यालयात नियमित बी.एड.चे ४४ विद्यार्थी व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे सत्र १९१६-१८ मध्ये ४४ विद्यार्थी व सत्र २०१७ - १९ मध्ये ४४ विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. सहाय्यक प्राध्यापक डॉ.डी.बी.इंगोले व डॉ.विठ्ठल घोनशेटवाड हे या अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणुन काम पाहतात. मा.प्राचार्यांच्या कुशल मार्गदर्शनानुसार तसेच प्राध्यापकांद्वारे अभ्यासक्रम राबविल्या जातात.

महाविद्यालयाची उल्लेखनीय बाब म्हणजे येथे उच्च विद्याविभुषीत प्राध्यापक वर्ग आहे. सर्व प्राध्यापक आचार्य पदवीधारक आहेत. महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग आपली व्यावसायिक प्रगती करण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य स्तरीय कार्यशाळेत व परिषदेस उपस्थित असतात. काही आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण करतात. विद्यापीठाच्या सहाय्यक प्राध्यापक नेयुक्ती, स्थाननिश्चिती समिती, संलग्नीकरण समिती व चौकशी समितीत या महाविद्यायातील प्राचार्य व प्राध्यापक प्रमुख वा दस्य म्हणुन भुमिका पार पाडतात.

महाविद्यालयाचा निकाल दरवर्षी ८० % च्या दरम्यान असतो. य.च.म.मुक्त विद्यापीठ २१६-१८ बॅचचा निकाल १०० % क्के लागला आहे. डॉ.डी.बी.इंगोले या बॅचचे समन्वयक आहेत.

महाविद्यालयाचे ग्रथांलय अतिशय सुसज्ज आहे. सध्या ग्रंथालयात८९८० पुस्तके २७ नियतकालीके व ०९ वृत्तपत्रे आहेत. वाचकांना सदैव पुरविली जातात. ग्रंथालयात पी.एच.डी., एम.एड.लघु संशोधन, कृतिसंशोधन या करीता संशोधन करण्यासाठी मी पुस्तके उपलब्ध असतात. ग्रंथालय प्रभारी डॉ.रेखा उपाध्ये यांच्या मार्गदर्शनात हर्षलता राऊत ह्या यशस्वीपणे ग्रंथालयाचे सर्व र्य पार पाडतात.

संगणकीय युगात झालेल्या क्रांतीचा व आधुनिकीकरणाचा परिचय होण्याच्या दृष्टीने महाविद्यालय सुसज्ज आहे. ओ.एच.पी, एम फिल्म प्रोजेक्टर, व्हीडीओ कॅमेरा, डिजीटल कॅमेरा, ऑडीओ सिस्टम इ. शैक्षणिक साहित्य महाविद्यालयात उपलब्ध आहे ोवेळी ते वापरण्यात येते.

प्रशिक्षणार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला व त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी विविध दिनविशेष, सांस्कृतिक कार्यक्रम, नयीन स्पर्धा, राष्ट्रीय सण याचे महाविद्यालयात आयोजन केले जाते. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी स्पर्धामध्ये भाग घेतात. भव्य स्पर्धांचे आयोजन डॉ.रेखा उपाध्ये यांच्या मार्गदर्शनात सुनिता कुळसंगे यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही वृत्ती व कामाचे विकेंद्रीकरण होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थी संसदेची ना केली जाते. संसदेचे मार्गदर्शक म्हणुन डॉ.विठ्ठल घोनशेटवाड कार्य करतात.

पालक मेळाव्याचे आयोजन डॉ.छाया महाले यांनी केले. माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन डॉ.डी.बी.इंगोले यांनी के विज्ञान मंडळ, गणित मंडळ, इतिहास मंडळ, पर्यावरण मंडळ, मराठी मंडळ यांची स्थापना करण्यात आली. व याद्वारे विविध उप राबविण्यात आले.

प्रशिक्षणार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक जागरुकता, सहकार्य वृत्ती व खेळाडु वृत्ती निर्माण करण्यासाठी भव्य-दिव्य अशा क्र सप्ताहाचे आयोजन डॉ.डी.बी . इंगोले यांच्या मार्गदर्शनात प्रतिमा थुल यांनी केले.

महाविद्यालयात स्थानिक सल्लागार समिती, आय.क्यु.ए.सी, सी.टी.ई कार्यक्रम सल्लागार समिती, स्टाफकॉन्सील, मा तक्रार निवारण/तक्रार निवारण समिती, बी.एड.प्रवेश समिती, अंतर्गत मुल्यनिर्धारण समिती , ग्रंथालय सल्लागार सम अॅन्टीरॅगिंग स्क्वाड समिती , भांडार पडताळणी समिती, साहित्य छपाई समिती, महाविद्यालयाचा विकास व वस्तुखरेदी सम वसतीगृह प्रवेश व व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी मंडळ, युजीसी विकास योजना नियोजन मंडळ, महाविद्यालय प स्वच्छता समिती, भा.स.शी. अर्ज तपासणी पडताळणी समिती, अकस्मात वर्गभेटी व टाचणे तपासणी समिती, दुरध्व अभ्यासक्रम सल्लागार समिती, खेळ/स्पोर्ट/जिमखाना समिती, करीअर कॉन्सीलींग आणि प्लेसमेंट सेल, विद्यार्थी शिष्य उपस्थिती समिती, वेळापत्रक समिती, विद्यार्थी संसद , उपक्रम शुल्क विनीयोग समिती, शैक्षणिक दिनदर्शिका समिती, मा अधिकार, सांस्कृतिक व वाड्मयीन समिती अशा विविध समित्या अस्तित्वात आहेत. त्या-त्या समितीतील सदस्य समित्यांचे चोखपणे पार पाडत आहेत. माजी विद्यार्थी मेळावा प्रभारी डॉ.दा.भो.इंगोले, पालकमेळावा प्रभारी डॉ.छाया महाले, विद्यार्थ वैद्यकिय तपासणी प्रभारी डॉ.छाया महाले, प्रशासकिय प्रभारी डॉ.रेखा उपाध्ये तर शैक्षणिक प्रभारी डॉ.विठ्ठल घोनशेवाड हे अ आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ.सुषमा गणोजे ह्या आहेत.

अशाप्रकारे संस्थेच्या व प्रशिक्षणार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता मा.प्राचार्य डॉ.सिमा लिंगायत यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापक, ग्रंथपाल व कार्यालयीन कर्मचारी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात सर्व उपक्रम यशस्व राबवितात. आम्ही सर्व महाविद्यालयाला प्रगतीपथावर नेण्याकरीता सतत प्रयत्नशील आहोत. व असेच नेहमी प्रयत्नशील राहु ग्वाही देत अहवाल संपविते.

धन्यवाद !

डॉ.रेखा उपाध्ये
सहाय्यक प्राध्यापक

माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार समिती

१)	डॉ.सीमा सुरेश लिंगायत दूरध्वनी क्रमांक : कार्यालय : ०७२३२-२५२७३२	प्राचार्य	अपिलीय अधिकारी
२)	डॉ.सुषमा मुकुंद गणोजे दूरध्वनी क्रमांक : कार्यालय : ०७२३२-२५२७३२	सहयोगी प्राध्यापक	माहिती अधिकारी
३)	श्री.ईश्वर पांडुरंग भोयर दूरध्वनी क्रमांक : कार्यालय : ०७२३२-२५२७३२	वसतीगृह अधिक्षक	सहाय्यक माहिती अधिकारी .

छात्रप्रमुख अहवाल

प्रगती म्हणजे सुखवाद व
ध्येयवाद यांच्या युध्दात
रक्तबंबाळ झालेल्या ध्येयाला
मिळणारा विजय.

'ज्ञानसेवा तु साफल्यम' असे लक्ष वेधुन घेणारे ब्रिदवाक्य असलेल्या आपल्या शासकीय अध्यापक महाविद्यालयाची माहिती सर्व प्रशिक्षणार्थ्यांना आहेच परंतु त्याला पुर्णार्थाचे रूप देण्याच्या उद्देशाने मी छात्र प्रमुख या नात्याने संस्थेचा अहवाल सादर करीत आहे.

पदवीपर्यंत शिक्षण सर्वांनी संपवुन सत्र २०१६-१७ मध्ये सर्वांनी शासकीय अध्यापक महाविद्यालयात प्रवेश घेतला. विद्येचे मंदिर असलेले शासकीय अध्यापक महाविद्यालय खरोखरच महान आहे. या ज्ञान मंदिरात शिकण्याचे भाग्य मिळाले त्यामुळे आम्ही सदैव ऋणी आहो. नवे विचार, नवे आचार, नवीन कल्पना, नवीन ज्ञान आणि प्रत्येक दिवशी नवीन अनुभव असे क्षितीजापलीकडेही दर्शन घडविणारे आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे नवनविन अन्वयार्थ उलगडुन दाखवणारे हे महाविदद्यालय म्हणजे जणु विकासाचे मंदिरच आहे. ज्ञानाची शक्ती असणाऱ्या या मंदिरातुन प्रेरीत होऊन उद्याचे भविष्य उज्वल करण्याचा आमच्यात आत्मविश्वास आहे.

धरुन ज्ञानाची कास, तु शिष्याला दिला नारा
चालतें बोलतें किर्तन करुन, उज्वल आसमंत सारा.

शिक्षण महाविद्यालयात खुप काही शिकायला मिळेल असे मी ऐकले होते आणि त्याची प्रचिती पदोपदी आली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आदर्श शिक्षक घडवण्यासाठी सर्व प्राध्यापक वृंदांनी कसोशीने प्रयत्न केले. आदर्श शिक्षकांचे गुण प्रशिक्षणार्थ्यांमध्ये विकसित करण्याचे उत्कृष्ट कार्य त्यांनी आपल्या अध्यापनाद्वारे व मौलिक मार्गदर्शनाद्वारे केले.

या शासकीय अध्यापक महाविद्यालयात प्रशिक्षण घेऊन एक परिपुर्ण शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगुन मी येथे आलो. येथे मला छात्र संसदमध्ये विद्यार्थी उपप्रतिनिधीचे स्थान मिळाले. हा खरोखरच एक अविस्मरणीय क्षण आहे. यातुन वर्षभरात वेगवेगळ्या उपक्रमातुन कला, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमातुन माझ्या अंतरंगातील कलांना विविध छटा मिळाल्या आणि एक सुंदर जीवन जगण्याची प्रेरणा मिळाली.

येथे मला जीवनातील स्वयं अध्ययनाची पंचसुत्री संजीवनीच्या रुपाने मिळाली. त्यात स्वस्थ आहार, स्वस्थ विचार, स्वस्थ आचार, स्वस्थ विहार आणि बदलासाठी सदैव तत्पर राहण्याची नवचेतना या शासकीय अध्यापक महाविद्यालयातुन मिळाली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व उत्कृष्ट शिक्षण घेऊन प्रशिक्षणार्थी आदर्श शिक्षक बनावा. या ध्येयाला अनुसरुन महाविद्यालयातर्फे मुल्यमापन कृतीसत्र, सरावपाठ, सुक्ष्मपाठ तसेच छात्रसेवाकाल यांचे आयोजन करण्यात आले.

आपल्या महाविद्यालयात कार्यक्रमाबरोबरच अभ्यासाकडेही लक्ष दिले गेले. महाविद्यालयात प्रत्येक अध्यापन पध्दतीची मंडळे स्थापन करण्यात आली. त्याद्वारे विविध कार्यक्रम घेण्यात आले एक चांगला शिक्षक होण्यासाठी त्याला फक्त विषयाचे ज्ञान असुन चालत नाही तर तो खेळातही निपुण असावा. या धोरणाला अनुसरुन प्राध्यापक ''थुल मॅडम'' यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्यात विविध खेळ घेण्यात आले.

तसेच प्रशिक्षणार्थ्यांना संगीताचे पण ज्ञान मिळाले पाहिजे या उद्देशाने प्रा.कुळसंगे मॅडम यांची नेमणुक करण्यात आली. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना सामाजिक सेवेचा अनुभव यावा म्हणुन सामाजिक सहभागांतर्गत परिसर स्वच्छता, रक्तदान शिबीर इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले. यासाठी सहाय्यक प्राध्यापक डॉ.दा.भो.इंगोले सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. आम्हाला एक परिपुर्ण शिक्षक होण्यासाठी जे गुण लागतात. ते आमच्या अंगी यावे यासाठी प्रा.डॉ.उपाध्ये, प्रा.डॉ.गणोजे, प्रा.डॉ.महाले, व प्रा.डॉ.घोनशेटवाड, डॉ.इंगोले यांनी उत्कृष्ट शिल्पकाराची भुमिका पार पाडली आणि ओबड-धोबड दगडातुन सुंदर मुर्ती शिल्पकार घडवतो त्याचप्रमाणे सर्व प्राध्यापकांनी आमचे व्यक्तिमत्व घडविण्याचे कार्य केले. तसेच आपल्या नेहमी पाठिशी असणाऱ्या आपल्या महाविद्यालयाच्या प्राचार्या आदरणीय डॉ.लिंगायत मॅडम नेहमी शिक्षकाला काय शिस्त असायला पाहिजे. हे पावलोपावली ध्यात आणुन देणाऱ्या व सतत मोलाचे मार्गदर्शन देणाऱ्या त्यांचा मी ऋणी आहे. ग्रंथ हेच गुरु असतात या गुरुचे यथार्थ दर्शन घडविण्याचे कार्य आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथपाल श्रीमती.गावंडे मॅडम यांनी केले. त्याबद्दल मी त्यांचे ऋण व्यक्त करतो.

महाविद्यालयात छात्रसंसद गठीत करण्यात आली. छात्रसंसदेला मार्गदर्शक प्रा.डॉ.घोनशेटवाड सर यांनी मार्गदर्शन केले आणि छात्रसंसदेने आपले कार्य अतिशय चांगल्या प्रकारे पार पाडले. त्यासाठी माझ्या सर्व संसद सहकार्यांनी मला योग्य सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. तसेच गेल्या वर्षभरात माझ्या सहकारी मित्र व मैत्रीणींनी मला वेळोवेळी मदत केली. त्यांच्याशिवाय मी कोणतेही कार्य पुर्ण करु शकलो नसतो, मी त्यांचा ऋणी आहे.

प्रत्येक गोष्ट करण्यासाठी, एक विशिष्ट वेळ असतो.
ठरलेल्या वेळेतच काम केल्यास, विजय मिळतच असतो.

निलेश मदन राठोड
छात्र उपप्रमुख

स्वागत :-

श्री.आकाश दुबे	:-	कनिष्ठ लिपीक - सहसंचालक कार्यालय, अमरावती येथुन बदलीने स्व पदोन्नतीने पुन्हा अमरावती येथे कार्यरत.
श्री.किशोर शेंडे	:-	प्रयोगशाळा सहाय्यक - शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा येथुन बदलीने रुजु.
श्री.चंद्रशेखर पटेल	:-	वरिष्ठ लिपीक - इ.बी.सी.वसतीगृह अमरावती येथुन बदलीने रुजु.
श्री.पी.डी. गुजर	:-	मुख्य लिपीक - सहसंचालक कार्यालय, नागपूर येथुन पदोन्नतीने रुजु.
श्री.राजेश राजवाडे	:-	शिपाई - महाविद्यालयात शिपाई पदावर रुजु.

निरोप :-

श्री.विलास दाभाडे	:-	व्ही.एम.व्ही.अमरावती येथे बदली (प्रयोगशाळा सहाय्यक)
श्रीमती.मिनाक्षी पिंगाणे	:-	सहसंचालक कार्यालय, अमरावती येथे बदली. (कनिष्ठ लिपीक)
प्रा.डॉ.नरेंद्र कडु	:-	नियत वयोमानानुसार निवृत्त (सहयोगी प्राध्यापक)
श्री.गजानन ठावरी	:-	नियत वयोमानानुसार निवृत्त (मुख्य लिपीक)
श्री.वसंत भोंगडे	:-	नियत वयोमानानुसार निवृत्त (शिपाई)
श्री.आकाश दुबे	:-	सहसंचालक कार्यालय येथे पदोन्नतीने बदली (वरिष्ठ लिपीक)

अभिनंदन :-

श्री.नितीन भालेराव	:-	विद्यापीठीय परीक्षेत महाविद्यालयातुन प्रथम.
श्री.अनुश्री मनगटे	:-	विद्यापीठीय परीक्षेत महाविद्यालयातुन द्वितीय.
श्री.सचिन जाधव	:-	विद्यापीठीय परीक्षेत महाविद्यालयातुन तृतीय.
श्री.शिवम राठोड	:-	महाराष्ट्र शासनाच्या सोशल मिडीया-महामित्र उपक्रमांतर्गत पुरस्कार.

डॉ.सीमा सुरेश लिंगायत (प्राचार्य)

१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्राचार्य पदावर नियुक्ती २९.११.२०१६.
- TeachR पोर्टलवर QCI सादर केला.
- प्राचार्याच्या निवड समितीत शासन प्रतिनीधी म्हणुन नियुक्त.
- CAS अंतर्गत स्थाननिश्चीती समितीवर शासन प्रतिनिधी.
- राष्ट्रीय परिषद बाभुळगांव पेपर सादर.
- १०.३.१८ अमरावती विद्यापीठ प्राचार्य Meet सभेत उपस्थित.
- य.च.म.मु.वि. नाशिक २०१६-१८ छात्र परिषद हृदय सन्मान.
- य.च.म.मु.वि. नाशिक द्वारा संचालित बी.एड.अभ्यासक्रम केंद्रप्रमुख व मार्गदर्शक म्हणुन कार्य २०१६-१८ व २०१७-१९ बॅचसाठी.
- जिल्हा परिषद हायस्कुल सरुळ किशोर उत्कर्ष मंच उपक्रमा अंतर्गत किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन दि. २.१.१८.
- वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय रक्तपेढी विभागाच्या वतीने महाविद्यालयास सन्मानपत्र.
- 'नॅकला सामोरे जातांना' राज्यस्तरीय चर्चासत्र इंदिरा महाविद्यालय, कळंब येथे उपस्थित.
- १६.१.१७ ते २०.१.१७ यशदा पुणे येथे उजळणी प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित.
- नवनियुक्त अधिकाऱ्यांचे पायाभुत प्रशिक्षण यशदा पूणे ८.११.१७ ते १९.१२.१७ उपस्थित.
- विविध कार्यशाळेचे आयोजन सक्रिय सहभाग व मार्गदर्शन
- EBC वसतिगृह यवतमाळ सन २०१७-१८ या सत्राकरीता माध्यमिक, उच्चमाध्यमिक व महाविद्यालय विद्यार्थी प्रवेशाच्या निवड सभेसाठी शासन प्रतिनीधी म्हणुन उपस्थित.
- EBC वसतिगृह यवतमाळ सत्र २०१७-१८ या सत्राकरीता धान्य व भाजीपाला निवीदा उघडण्याकरीता शासन प्रतिनीधी म्हणुन उपस्थित.
- महाविद्यालयात CCTV बसविले.
- प्रयोगशाळेचे नुतनीकरण केले.
- नाहरकत प्रमाणपत्र तपासणी - जिल्हा समन्वयक - वाशिम व यवतमाळ जिल्ह्यासाठी.

डॉ. रेखा उपाध्ये (सहाय्यक प्राध्यापक)

ाढ व विकास विषयांचे अध्यापन (सेमीस्टर १)
अध्ययन व अध्यापन विषयाचे अध्यापन (सेमिस्टर २)
तिहास अध्यापन पद्धतीचे अध्यापन (सेमिस्टर २ व ३)
ान आणि अभ्यासक्रम विषयांचे अध्यापन (सेमिस्टर ४)

भार -
- सराव पाठ (आंतरवासियता)
- प्रशासकीय प्रमुख
- सांस्कृतिक विभाग
- शालेय अनुबंध
- नाट्य व कला विभाग
- दिनविशेष व राष्ट्रीय सण
- ग्रंथालय
- महाविद्यालय विकास समिती
- मा. प्राचार्यांच्या अनुपस्थितीत महाविद्यालयाचा प्रभार.

पस्थिती :

शासकीय अध्यापक महाविद्यालय भंडारा येथे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात उपस्थित व पेपर सादर.

यशदा पुणे येथे उजळणी प्रशिक्षणास उपस्थित.

- **नियुक्ती :**
  स्थान निश्चिती समितीवर शासन प्रतिनिधी.
  ना हरकत प्रमाणपत्र तपासणी समिती सदस्य.
  बी.एड.प्रवेश समिती सदस्य.
  CET LLB ऑनलाईन परीक्षेसाठी पर्यवेक्षक म्हणुन कार्य.

तज्ज्ञ मार्गदर्शक :
शैक्षणिक साहित्यनिर्मिती कार्यशाळा.
सुक्ष्म अध्यापन कार्यशाळा.
कृतिसंशोधन कार्यशाळा.
कार्यानुभव कार्यशाळा.
ओळख स्वतःची कार्यशाळा.

समंलक :-
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक बी.एड २०१५-१७, २०१६-१८

डॉ.सुषमा मुकुंद गणोजे (सहयोगी प्राध्यापक)

अध्यापन :-
१) विद्याशाखा व विषयांचे आकलन.
२) अध्ययनाचे मुल्यनिर्धारण
३) जैविक विज्ञान भाग १ व भाग २
४) भौतिक विज्ञान भाग १ व भाग २

समंलक :-
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक बी.एड २०१५-१७, २०१६-१८

प्रभार :-
शैक्षणीक साधन निर्मिती कार्यशाळा (१६-१७, १७-१८)
सुक्ष्म अध्यापन कार्यशाळा (१६-१७, १७-१८)
पर्यावरण प्रकल्प (१६-१७)
ओळख स्वतःची कार्यशाळा (१७-१८)
विज्ञान मंडळ
आजादी ७० अंतर्गत निबंध व वकृत्व स्पर्धा समन्वयक
शिस्त व उपस्थिती (१६-१७, १७-१८)
शैक्षणिक मुद्रण साहित्य (१७-१८)
माहिती पुस्तिका (१६-१७, १७-१८)
ओळखपत्र (१६-१७, १७-१८)
अंतिम पाठ परिक्षा (१६-१७)
IQAC समन्वयक (१६-१७)
QCI समन्वयक (१७-१८)

नियुक्ती
माहिती अधिकारी
तक्रार निवारण समिती सदस्य, सचिव
विशाखा समिती सदस्य, सचिव
खरेदी समिती सदस्य
महाविद्यालय विकास समिती सदस्य
ग्रंथालय समिती सदस्य
वसतीगृह समिती सदस्य
बी.एड.प्रवेश समिती सदस्य
यु.जी.सी. सल्लागार समिती सदस्य

विद्यापीठ परीक्षा परिक्षक :

१) ईश्वर देशमुख शिक्षण महाविद्यालय, दिग्रस

२) कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर अध्यापक व अनुसंधान महाविद्यालय, आपोती (खु)

३) शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ

बी.एड.प्रवेश ऑनलाईन परिक्षा :

सेंटर इन्चार्ज, ION DIGITAL ZONE IDZ CITYLAND, अमरावती.

शासन प्रतिनिधी : नविन विद्याशाखा / अतिरिक्त तुकड्या सुरु करण्यात आल्यामुळे महाविद्यालयाची तपासणी.

१) अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ

२) गोपिकाबाई गावंडे महाविद्यालय, उमरखेड

३) मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

४) इंदिरा महाविद्यालय, कळंब

५) स्व.कं.जी.वाघ महिला महाविद्यालय, कळंब

स्थाननिश्चीती/सलग्नीकरण चाट / प्राध्यापक मुलाखती

१) बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ

२) बी.बी.आर्टस, एन.बी.कॉमर्स व बी.पी.सायन्स कॉलेज, दिग्रस.

३) फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद

४) जीजामाता कला महाविद्यालय, दारव्हा

५) श्रीमती नानकीबाई वाघवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ

६) शिवरामजी मोघे महाविद्यालय, यवतमाळ

७) लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी

८) के.एम.असगर हुसेन शिक्षण महाविद्यालय, बुलडाणा

९) शासकीय अध्यापक महाविद्याल, यवतमाळ

१०) आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळ

११) शिवशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगांव

१२) लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ

१३) श्रीमती वत्सलाबाई नाईक महाविद्यालय, पुसद

१४) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव (रोड)

१५) नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेरपरसोपंत

चार्य प्रतिनिधी :

- एन.सी.टी.ई सुधारित निकषांची पुर्तता करण्याबाबत सभेत प्राचार्याचे प्रतिनीधी या नात्याने शिक्षण संचालनालय, पुणे येथे उपस्थित.
- रा.ल.तो. महाविद्यालय, अकोला येथे परीक्षेसंबंधी कार्यशाळेस उपस्थिती.

मिती सदस्य : शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

१) शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ

२) डायाभाई पटेल शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ

३) बाबासाहेब नंदुरकर शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ

४) आदर्श अध्यापक महाविद्यालय, कारंजा लाड

डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल इ.स. १८९१ साली. मध्य प्रदेशातील इंदुर जिल्ह्या मधील महु या लष्करी छावणी असलेल्या गावात झाला. त्यांचे नाव 'भिमा' असे ठेवण्यात आले. तसेच भीम, भीमा व भीमराव नावानेही कुटुंबिय व शेजारचे लोक त्यांना हाक मारत. भीमराव आई-वडिलांचे १४ वे अपत्य होते.

त्यांचे कुटुंब त्याकाळी अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीचे आणि मुळचे महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात असलेल्या आंबडवे गावचे होते. भीमरावांचे वडिलही ब्रिटिशांच्या भारतीय सेनेत नोकरी करत होते आणि तेथे त्यांनी मराठी व इंग्रजी भाषेचे यथाविधी शिक्षणही घेतले होते. त्यामुळे त्यांनी आपल्या मुलांना आणि विशेष करुन भिमरावाला शिक्षण देऊन ज्ञानोपासनेची प्रेरणा दिली. इ.स.१८९६ मध्ये अवघ्या ५ वर्षीय भीमरावांच्या आई भिमाबाईचे मस्तकशूळ या आजाराने निधन झाले. त्यानंतर त्यांचे संगोपन त्यांच्या आत्या मीराबाईंनी केले.

भीमराव वयाने लहान असल्यामुळे कॅम्प दापोली येथील शाळेत त्यास प्रवेश देता आला नाही. यामुळे घरीच लहानग्या भिमरावास अक्षर ओळख करावी लागली इ.स.१८९६ मध्ये सुभेदार रामजींनी आपल्या परिवारासह दापोली सोडली व ते सातारा येथे सुरुवातीला एका साधारण घरात राहिले आणि थोड्याच दिवसानंतर भाड्याने घेतलेल्या एका बंगल्यात आपल्या परिवारासह राहु लागले. त्यावेळी भीमरावांचे वय ५ वर्ष झाले होते. सुभेदार रामजींनी इ.स.१८९६ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथील कॅम्प स्कुल मध्ये भीमरावचे नाव दाखल केले. बाबासाहेबांचे मुळ गांव कोकणामधील आंबडवे व मुळ कोकणामधील आडनांव सपकाळ होते.

साताऱ्याचा या शाळेत बाबासाहेबांना शिकवण्यासाठी कृष्ण केशव आंबेडकर नावाचे देवरुखे ब्राम्हण शिक्षक होते. शाळेच्या दप्तरात नोंदवलेले भीमरावाचे 'आंबावडेकर' हे आडनाव उच्चारताना त्यांना ते आडनिडे वाटत असे म्हणुन त्यांचे 'आंबेडकर' हे नांव धारण केले. अशा प्रकारे भीमरावांच्या शिक्षणाचा आरंभ झाला. पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या शालेय व महाविद्यालयीन जीवनात १८-१८ तास अभ्यास करत असत.

त्यांनी वडिलांना सरळ विचारले की ''ज्या ग्रंथात केवळ ब्राम्हण आणि क्षत्रिय यांचा गौरव आणि शुद्र व अस्पृश्यांची नालस्ती केली आहे. ते महाभारत व रामायणसारखे ग्रंथ त्यांनी बाबासाहेबांना वाचावयास का सांगितले ? तेव्हा त्यांचे वडिल म्हणाले '' आपण अस्पृश्य जमातीचे आहोत आणि यामुळे तुला न्युनगंड होण्याची शक्यता आहे. या ग्रंथाच्या वाचनाने हा न्युनगंड दुर होण्यास मदत होईल.''

भीमराव आंबेडकर यांनी मुंबई येथील एलफिस्टन कॉलेजमध्ये शिकुन नोव्हेंबर १९१२ मध्ये मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची. परीक्षा दिली. जानेवारी १९१३ मध्ये बी.ए.च्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. तत्पुर्वी जानेवारी १९०८ पासुन गुरुवर्य केळुस्कर आणि निर्णय सागर छाप खान्याचे मालक दामोदर सावळराम यंदे यांच्या प्रयत्नांनी कॉलेजच्या शिक्षणासाठी बडोदा यांच्याकडुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना रु.२५/- दरमहा शिष्यवृत्ती मंजुर करण्यात आली होती. मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची पदवी संपादन करणारा अस्पृश्य जातीतील पहिला विद्यार्थी होण्याचा मान आंबेडकरांना मिळाला.

महाराज बडोदा संस्थान त्यांच्या वतीने काही विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी अमेरिकेला पाठवण्याच्या विचारात होते. महाराज सयाजीराव गायकवाड भिमरावांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वावर प्रसन्न होते. महाराजांनी व भीमरावांना होकार दिल्यामुळे ४ एप्रेल १९१३ रोजी बडोदा संस्थाच्या विद्याधिकाऱ्यांनी परदेशात अभ्यास करण्यासाठी चार विद्यार्थी निवडले यात भीमराव आंबेडकर एक होते. या प्रत्येकास दरमहा साडे अकरा पाऊंड शिष्यवृती मंजुर केली.

त्यासाठी त्यांनी एक करारपत्र मंजुर केले. या करारपत्रावर साक्षीदार म्हणुन त्रिभुवन व्यास आणि अंताजी गोपाळ जोशी यांनी नांक १८ एप्रिल १९१३ रोजी सह्या केल्या. या करारानुसार शिष्यवृत्तीची मुदत १५ जुन १९१३ ते १४ जुन १९१६ पर्यंत एकुण तीन वर्षांची होती.

कोलंबिया विद्यापीठामध्ये अर्थशास्त्र शाखेत त्यांनी १९१३ ते १९१६ या तीन वर्षांसाठी प्रवेश मिळवला. त्यांनी या अभ्यासाकरता प्रमुख विषय अर्थशास्त्र व इतर विषय म्हणुन समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानवशास्त्र आणि तत्वज्ञान हे विषय निवडले.

अर्थशास्त्र, राजकरण, मानववंशास्त्र, नितीशास्त्र, व्यापार समाजशास्त्र या विषयांचा अभ्यास करुन त्यांनी कोलंबिया विद्यापिठात दि.१५ मे १९१५ रोजी ॲडमिशन ॲन्ड फायनन्स ऑफ इस्ट इंडिया कंपनी हा प्रबंध सादर केला. २ जून १९१५ रोजी या प्रबंधाच्या आधारावर त्यांना एम.ए.पदवी मिळाली.

शैक्षणिक जागृती :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना कनिष्ठ जातींच्या शैक्षणिक मागासलेपणाची जाणीव होती. ह वर्षापासुन त्यांना शिक्षण नाकारले होते. अज्ञान व निरक्षरता यामुळेस ते मागासले होते. उच्च जाती स्वतः करीत नव्हत्या ती उच्च जाती कनिष्ठ जाती कडून करवून घेत. जातींना त्यांच्या या दयनीय स्थितीचे कारण शिक्षणाचा अभाव हेच आहे याची जा करुन दिली. त्यांच्या मुलांना शाळेत पाठवावे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना प्रोत्साहन दिले. या मुलांना शिष्य गणवेश, भोजन व निवारा अशा सुविधा पुरवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या कोठ्यावधी अनुयायांना ''शिका, संघटि आणि संघर्ष करा'' असा धारदार व महान संदेश दिला.

विद्यार्थी मित्रांनो हजारो वर्ष जी माणसं गुलामीच्या बंधनात बंदिस्त होती, तोंड असुन ज्याला बोलता येत नव्हतं, माणस ज्यांना माणसांसारख जगता येत नव्हतं डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जिवांच रान करुन त्याच माणसाला बोल शिकविलं. माणसासारख वागायला शिकविलं. तिच माणस बोलु लागली माणसासारखी वागु लागली. ताठ मानेनं जगु लागली.

सय्यद जहीर सय्यद वजीर बी.एड. प्रथम

संत गाडगेबाबा

'' कण कण करुनी कोटी केले, कल न खर्चीले स्वहितासाठी ।
वण वण फिरुनी कण कण झिजले बाबा दुःखी जनतेसाठी '' ।

या उक्तीप्रमाणे थोर समाजसुधारक कर्मयोगी संत गाडगे बाबा यांनी एखाद्या झंजावातासारखे आपले अख्खे घालवले. इ.स.२३/०२/१८७६ साली जन्म होऊन इ.स.२०/१२/१९५६ मध्ये निर्वाण होईपर्यंत तब्बल ८० वर्षाचे आयुष्य अखंडीत दुःखी दलीत, गरीब जनतेच्या उद्धारासाठी घालवले.

लोकोत्तर युगपुरुष संत गाडगेबाबा यांचे जीवन चरित्र बघितले असता त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलु आपल्याला दि त्यांनी आपल्या षड्रिपुंवर मोठ्या कष्टाने, अतिशय यातना सहन करुन, त्याग करुन मात केली आणि स्वतःची अशी एव पध्दती अंगीकरुन समाजात असणाऱ्या वाईट चालिरीती, रुढी, परंपरा, कर्मकांड व अंधश्रध्दा यावर प्रबोधन करुन आवाज स्वतः तसे वागुन त्या मोडीस काढल्या. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले आणि जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो तोची साधु ओळखावा देव तेथेची जाणावा या संत वचनानुसार त्यांनी आविरत कार्य केले. गाडगे बाबांच्या जीवनाचे प्रे त्याग, स्वच्छता, नम्रता, समता व बंधुभाव हे सप्त पान बनले.

कोणत्याही प्रकारचे शिक्षण न घेता समाजाच्या विद्यापीठातुन स्वानूभवाने संत गाडगे बाबांनी आपले तत्वज्ञान स दिले. म्हणुनच त्यांना चालते बोलते विद्यापीठ असे संबोधतात. आपले तत्वज्ञान लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी किर्तन माध्य कारण तत्कालीन समाज गरीब अंधश्रध्दाळु, अशिक्षित आणि दैववादी होता. त्यांना जागृत करण्यासाठी त्यांना संत श्री.संत ज्ञानेश्वर ,कबीर यांच्या अभंगाचा वापर करुन आणि समाजाचे निरीक्षण करुन निर्मोही, निरीच्छ, निर्भय वृत्ती आ व सहनशील वृत्तीने वागुन कीर्तनातुन लोकांशी संवाद साधुन त्यांच्याकडुनच वदवुन घेत त्यांनी खालील प्रमाणे शिकवण दि

देव अनेक नसुन एक आहे. देव साकारही नाही. आणि निराकारही नाही. कारण देव कुणी आजपर्यंत पाहिला नाही अंगात येत नाही तो अंगात येणे हे ढोंग आहे. थोतांड आहे. सत्यनारायण आणि पिंडदान ही भटांच्या पोट भरण्यासाठी सो पटविण्यासाठी ते एक छान उदाहरण द्यायचे ते म्हणायचे.

''गेल्या दोन महायुद्धात इग्लंड अमेरिकेच्या मोठमोठ्या बोटी महासागरात बुडाल्या त्या बाहेर काढण्य सत्यनारायणाची मोठी युक्ती अजुन त्यांना कुणी सांगितली कशी नाही. कोण जाणे ? देवापुढे पैसे, फळे ठेऊ नका का काही खाता येत नाही. आणि सगळे जर देव आपल्याला देतो तर देवापुढे काही कशाला ठेवायचे? असा प्रश्न त विचारायचे.

नवसाने पोर होत नाही हे पटवायासाठी ते तुकोबांचा अभंग सांगायचे.

नवसे कन्या पुत्र होती! मग का कारणे लगे पती हे सांगुन ते म्हणायचे की तीर्थक्षेत्र, जत्रा– यात्रा ही भारी भोळ लोकांना लुबाडायची दुकाने आहेत. म्हणुन लोकहो सावध राहा.

जादुटोणे आणि चमत्कार यांचा त्यांनी प्रखर विरोध केला यावर ज्यांचा विश्वास आहे, त्यांची टर उडवतांन ''जादुटोणे चमत्कार करुन काहीही साध्य करता येत असेल आणि कुणाचाही धुव्वा उडविता येत असेल तर तो देवा म्हटला पाहिजे. लढायात असले आठ दहा मुठ मारणारे सोडले का काम भागले. कशाला हव्यात बंदुका, तोफा आणि अॅ ते सांगत व म्हणत.

"मंत्रेची वैरी मरे । तरी का बांधावी कटयारे "

हुंडा, दहेज अशा आजही भेडसावणाऱ्या सामाजिक समस्येचा विचार त्या काळी त्यांनी केला आपल्या कीर्तनातुन हुंड्यामुळे होणारे वधुपित्याचे हाल व प्रसंगी कर्जबाजारी होऊन वधु पिता कसा रसातळाला जातो याचे हृदयद्रावक वर्णन करायचे व हुडा घेणाऱ्या वराला हेल्याची उपमा देऊन त्याची टर उडवायचे अशी त्याकाळात त्यांनी हुंडा बंदीची बीजे रुजविली.

गाडगे बाबांनी शिक्षणाचे महत्व जाणले. ते म्हणत शिक्षणाशिवाय माणुस धोंडा, नुसता बैल बनतो. शिक्षणाशिवाय माणुस कसा लुबाडला जातो. व सावकाराच्या कचाट्यात सापडतो. तसेच तो कसा जनावरा सारखा राबवुन घेतल्या जातो हे त्यांनी अनुभवले होते. शिक्षणाचं महत्व पटवुन देतांना ते म्हणत तर जेवणाचं ताट मोडा हातावर भाकरी खा. बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या. तुम्ही तुमचे सणवार यात्रा साधेपनानं करा. इव्हायाले पाहुणचार करु नका, पण मुलाले शाळेत घातल्याविना सोडु नका, विद्या मोठं धन आहे. यातलेच मानसं दिल्लीच्या तक्तावर भाशेन करतात. आणि यातलेच मानसं बोरीबंदराच्या ठेसनावर पोते उचलतात, ते मानस अन हे कोन? हे काई बैल नाहीत ना ? असे अनेक दाखले ते देत असत.

बाबा जसे दयाळु होते तसे ते कठोरही होते. त्यांचे मन भुतांविषयीच्या करुणेने भरलेले होते. त्याच बरोबर ते स्वत: बाबत उदासिन होते. अपार कष्ट करण्याचे सामर्थ्य त्यांनी प्रयत्नांनी मिळविले. त्यांची सहनशक्ती अमर्यादित होती. रुपयांच्या प्रवाहात सतत असुन देखील स्वतःसाठी वा नातलगासाठी त्यांनी कधी पैही खर्चली नाही ते त्यागाचा आदर्श होते आणि त्याचबरोबर अतिशय संचयी होते. एका पैशाचाही काटेकोर हिशेब ते ठेवीत असत. त्यांनी जनतेच्या सेवेसाठी संपुर्ण महाराष्ट्रभर अनेक सेवाभाची संस्था उभारल्या. पण त्याचे मालक मात्र ते झाले नाही ह्या करोडो रुपयांच्या संस्थावर त्यांनी विश्वस्त नेमले व स्वःत प्रमुख विश्वस्त म्हणुन राहिले.

सोमेश्वर वामनराव राठोड बी.एड.प्रथम वर्ष

हिताय सुखात देव-मनुस्सानं ।
नमो तस्स भगवतो अरहतो सम्मा-सम्बुद्धदस्स ।

मनो-कायीक आहार

(Nutriment : Physical and Mental)

) सब्बे सत्ता आहार तिट्ठिका । सर्व सत्व आहारावर जगणारे आहेत. (खुद्दक पाठ)

) आहरती ति आहारो । आहारण करते (त्याकडे नेते) म्हणुन त्यास आहार म्हणतात. कवळीकार स्पर्श, मनसंचेतन आणि विज्ञान आहार असे चार आहार आहेत. कवलिकार आहार रुप कायेचे पोषण करते तर स्पर्श, मनसंचेतन आणि विज्ञान आहार (अरुप) नाम कायेचे पोषण करते म्हणजे संप्रयुक्त धर्म आणि त्याच्याशी संबंधीत रुपाचे पोषण करते.

) कवळीकारो आहारो ओजट्ठमकं रुपं आहरति । कवलीकार (घास करुन खाल्ला जाणार स्थुल) आहार, ओजट्ठमक - रुपाचे (पृथ्वी (खरात्व), आप (जलत्व), तेज (उष्णत्व), वायु (चलत्व), वर्ण, गंध, रस आणि ओ ज स् हारण करते. फस्सोहारो तिस्सो वेदना आहरति । स्पर्श आहार तिन वेदनांचे (सुख, दु:ख, असुख-अदु:ख) आहरण करते. मनसश्चेतनाहारो तीसु भवेसु पटिसन्धी आहरति । मनसचेतन आहार तिन भवाचे (काम, रुप, रुप) आहरण करते.विञ्ञणाहारो पटिसन्धिक्खणे नामरुपं आहरती । विज्ञान आहारप्रतिसन्धीच्या क्षणी नामरुपाचे (रुप, वेदना, ा, संस्कार, विज्ञान/वेदना, संज्ञा, चेतना, स्पर्श,मनसिकार) आहरण करते. (विशद्धिमग्न, आहार प्रतिकुल संज्ञा).

कवलीकार आहार प्रवृत्तीनुसार घेतला तर कायीक आरोग्य लाभते.

१) वात प्रवृत्ती

केस, नखे, हात, पाय, तोंड खरखरीत, रुक्ष व रखरखीत असतात. हाता-पायाच्या त्वचेला भेगा पडलेल्या असतात. हाता-ावरील शिरा टरटरीत फुललेल्या दिसतात. केस थोडे व ताट/रट असतात. मळाचे खडे धरतात म्हणुन शौचाला नीट साफ होत ी. पोटात वात/वायु धरण्याची प्रवृत्ती असल्याने पोट फुगते व पोटात गुरगुर आवात येतो. स्वर रुक्ष व कर्कश असतो. चालताना ्यात व पायात कटकट आवाज येतो.

बुद्धि, स्वभाव चंचल वाऱ्यासारखा असतो. स्मरणशक्ती कमी असली तरी विषय चटकन समजुन घेण्याची कुवत असते, ाचार कमी असतात, उपकाराची जाणिव नसते. झोप कमी असते. झोपेत दात खाण्याची सवय असते. मैत्री दृढ नसते

थंड स्पर्श, थंड पदार्थ नकोसे वाटतात. कंबरदुखी, थोड्या श्रमाने पाय दुखणे, कानाला थंडी, वारा सहन न होणे. सांधे णे, सांधे घरणे. हाता-पायांना भेगा/चिरा पडणे. केसात कोंडा होणे. शरीर कृश, स्वभावाने रागीट असणे.

कफ प्रवृत्ती

गुटगुटीत, सशक्त अंगकाठी. गोरा रंग. घट्ट दाट केस. अंगावर मेदा (चरबी) च्या आवरणाची गोलाई असते. हातापायाच्या दिसत नाहीत. त्वचेवर तुकतुकीतपणा असतो. आहार कमी असुनही याचे वजन नेहमीच वाढलेले असते. थोडं खाल्ले तरी अंगी ते. तसेच बळ आणि शक्तीही चांगली असते. कष्ट करायची ताकत असते. व्यक्ती कडक असते, भुक कमी, उपवास सहन करु ते.

सर्वच व्यवहार, हालचाली संथ असतात. त्यांन कसलीच घाईत व उतावीळपणा नसतो. स्वभावाने शांत असतात. वागणे, े, चालणे नम्र व आदरयुक्त असते. मैत्री चांगली दृढ असते. वृत्तीने समाधानी असतात. कमी बोलणाऱ्या, आपल्या गतीने कृती न दाखविणाऱ्या असतात. थोडक्यात आळस आणि मंदपणा हा यांच्या प्रकृतींचा स्थायीभाव असतो.

छाती, श्वसनसंस्थान दुबळी असते. दमा. नाक हे महत्वाचे दुबळे स्थान आहे. थंड पाणी, आईसक्रिम, थंड वारा सोसत नाही.

३) पित्त प्रवृती

व्यक्ती उजळ, गहुवर्णी असतो. नखे, जीभ, ओठ लालसर दिसतात. अंगावर तीळ, वांग अधिक प्रमाणात असत शिडशिडीत नाजुक प्रकृती व त्वचा असते.

बुद्धिमान, महत्काकांक्षी, डोकेदुखी पाचवीला पुजलेली असते. टेंशन घेणाऱ्या (चिंतातुर) असतात. खुप घाम येतो. बो चालणे खुप गतीमान असते. त्वचेला सुरकुत्या लवकर पडतात. केस लवकर पिकतात, गळतात. केस पिंगट मुलायम असतात. विशेषता हाता-पायाचे तळवे स्पर्शाला गरम लागतात. उष्ण हवा सोसत नाही.

व्यक्ती तेजस्वी दिसतात. स्वतःच्या विषयावर प्रभुत्व असते. वादविवादात सहसा हार मानत नाहीत. बोलणे असे ठासुन असत साधे बोलतानाही भांडत असल्यासमान वाटते. स्वभाव : निर्भय असतात. राग लवकर येतो पण तेवढ्याच लवकर शांत होतात. इ जिद्दी, फटकुन वागणाऱ्याशी कठोरतेने वागतात. नम्रतेने वागणाऱ्याशी ते प्रेमाने वागतात. भुक अजिबात सहन होत नाही.

ॲसिडीटीची तक्रार, कोठा हलका असतो (अन्न लवकर पचते), शौचाला साफ होते. हिवाळा ऋतु आवडतो. थंड स्पर्श पदार्थ यांना आवडतात. तहान अधिक लागते. थंड पाणी प्यायला आवडते. उपमा सोसत नाही. मंद सुगंधी फुले, हिरवा रंग, रम्य होण्याची आवड असते. त्वचा क्रांतीमान असते. स्निग्ध गुणामुळे नरमही राहते. पित्ताचा व रक्ताचा घनिष्ठ संबंध असत त्वचेवर विशेषतः गालावर लाली, ओठावर रक्तिमा असते. त्वचाविकार, अंगावर व चेहऱ्यावर पुरळ येतात. वारंवार तोंड आहारात (लहानपणी) गोड, तुरट, कडु आवडते. (वागभट्ट,अष्टांगहृदय)

वात, कफ, पित्त या प्रवृत्ती आणि सन्निपात याच्या आश्रयानेच आपल्या शरीरात आजार उत्पन्न होतात. या प्रवृत्ती ए व्यक्तीत अनेक असु शकतात. जसे, वातकफ, वातपित्त, कफपित्त, वातकफपित्त इ. निरोगी राहण्यासाठी आपल्या स्व आपल्याला माहित असला की मानसिकता, खान-पान. विश्रांती, ऋतुमानानुसार काळजी घेऊन आपण सुखी होऊ शकतो घरच्यांनाही आपला स्वभाव लक्षात आला वा त्यांचा स्वभाव आपल्याला कळला तर एकमेकांशी बागण्या-बोलण्यात व का घेण्यात पाहिजे तो ताळमेळ बसवुन संसारात सुखाने राहता येणे शक्य असते.

कार्यीक प्रवृत्ती

१. वात - वायु (चजत्व)
२. कफ - जल, पृथ्वी (जलत्व, खरत्व)
३. पित्त - अग्नि, तेज (उष्णत्व)
४. सन्निपात

आहार रस - मधुर (गोड, स्वादिष्ठ), आम्ल (आंबट, निंबु आदि), लवण (खारट), कटु (तिखट, मिर्ची आदि), तिक्त (कडु, आदि), कषाय (तुरट, आंवळा आदी)

उदाः- आवळा - पाच रसांनी युक्त (यात तिखटपणा नसतो)

वात : शमन - मधुर (गोड), आम्ल (आंबट), लवण (खारट)
प्रकोप - कटु (तिखट), तिक्त (कडु), कषाय (तुरट)

पित्त : शमन - मधुर (गोड), तिक्त (कडु), कषाय (तुरट)
प्रकोप - आम्ल (आंबट), लवण (खारट), कटु (तिखट)

चतुन्नं महाभुतानं उपादायरुपं । चार महाभुतांच्या आश्रयाने उपादाय रुप (वर्ण, गंध, रस, ओजस्) बनतात.
आहारातील रस व कायीक प्रवृत्ती यांचा मेळ राखुन निरोगी राहता येणे शक्य आहे.
स्पर्श, मनसंचेतल आणि विज्ञान आहाराचे संतुलन असले की मानसिक आरोग्य लाभते.
आपल्याला कळला तर एकमेकांशी बागण्या-बोलण्यात व काळजी घेण्यात पाहिजे तो ताळमेळ बसवुन संसारात सुखाने राहत शक्य असते.

कार्यीक प्रवृत्ती

१. वात - वायु (चजत्व)
२. कफ - जल, पृथ्वी (जलत्व, खरत्व)
३. पित्त - अग्नि, तेज (उष्णत्व)
४. सन्निपात

आहार रस - मधुर (गोड, स्वादिष्ठ), आम्ल (आंबट, निंबु आदि), लवण (खारट), कटु (तिखट, मिर्ची आदि), तिक्त (कडु, आदि), कषाय (तुरट, आंवळा आदी)

उदाः- आवळा - पाच रसांनी युक्त (यात तिखटपणा नसतो)

वात : शमन - मधुर (गोड), आम्ल (आंबट), लवण (खारट)
प्रकोप - कटु (तिखट), तिक्त (कडु), कषाय (तुरट)

पित्त : शमन - मधुर (गोड), तिक्त (कडु), कषाय (तुरट)
प्रकोप - आम्ल (आंबट), लवण (खारट), कटु (तिखट)

चतुन्नं महाभुतानं उपादायरुपं । चार महाभुतांच्या आश्रयाने उपादाय रुप (वर्ण, गंध, रस, ओजस्) बनतात.
आहारातील रस व कायीक प्रवृत्ती यांचा मेळ राखुन निरोगी राहता येणे शक्य आहे.
स्पर्श, मनसंचेतल आणि विज्ञान आहाराचे संतुलन असले की मानसिक आरोग्य लाभते.

१) अ. सुख वेदनिय स्पर्श झाला की, सुख वेदना उत्पन्न होते. तेव्हा मी सुख वेदना अनुभव करीत आहे. असे वाटते सुख वेदनिय स्पर्शाचा निरोध झाला की, सुख वेदनिय स्पर्शामुळे उत्पन्न सुख वेदना त्याचा विषय दुर झाल्यावर निरुद्ध होते तेव वेदना निरुद्ध झाली असे वाटते.

आ. दुःख वेदनिय स्पर्श झाला की, दुःख वेदना उत्पन्न होते, तेव्हा मी दुःख वेदना अनुभव करीत आहे. असे वाटत त्याच दुःख वेदनिय स्पर्शाचा निशेध झाला की, दुःख वेदनिय स्पर्शामुळे उत्पन्न दुःख वेदना त्याचा विषय दुर झाल्यावर निरुध्द होते तेव्हा दुःख वेदना निरुद्ध झाली असे वाटते. इ. असुख-अदुःख वेदनिय स्पर्श झाला की, असुख-अदुःख वेदना उत्पन्न होते, तेव्हा मी असुख-अदुःख वेदना अनुभव करीत आहे असे वाटते. त्याच असुख-अदुःख वेदनिय स्पर्शाचा निरोध झाला की, दुःख वेदनिय स्पर्शामुळे उत्पन्न दुःख वेदना त्याचा विषय दुर झाल्यावर निरुद्ध होते तेव्हा असुख-अदुःख वेदना निरुद्ध झाली असे वाटते. वेदनांविषयी असे जाणुन त्यास रस घेतला नाही तर आतंरीक सुख लाभते.

२) मनसंचेतन, संस्कार हेच दुःख आहे. संजानन हेच व्याधि उत्पन्न होण्याचे कारण आहे. काया स्वभावताच उन्ह, थंडी, भुक, तहाण, मल-मुत्र त्याग, डांस - मच्छर - वातातप - सरिसृप यांचा स्पर्श, वात, कफ पित्त प्रकोप आणि कर्म विपाकाने उत्पन्न आजार याचे दुःख देणारी आहे. कायेत सतत बदल होत राहतो. म्हणुन त्याप्रती अनभिरत राहावे. सर्व कायीक, वाचीक व मानसिक संस्कारांचे शमन आंतरीक सुख आहे. पुण्य, अपुण्य आणि अनन्यभिसंस्कारामुळेच काम, रुप व अरुप भव निर्माण होते.

३) विज्ञान आहार पुन्हा पुन्हा जन्म घेण्याचे कारण आहे. विज्ञान प्रतित्य समुत्पन्न आहे. ज्ञान संप्रयुक्त विज्ञानामुळे कुशल चेतना/भावना उत्पन्न होतात, त्यामुळे आंतरीक सुख लाभते.

कवलीकार आहार घेण्याची निश्चित वेळ असावी, मात्रा निश्चीत असावी कारण अन्न पचन संस्थेची काम करण्याची आपली मर्यादा आहे. त्यात नियोजितता नसली की पोटाचे आजार उत्पन्न होतात. तसेच स्ट्रेसमुळे पाचनतंत्र मंदावते, म्हणुन आंतरीक आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे.

पौर्णिमा, अष्टमी, अमावश्या, पौर्णिमा असे महिन्यातील चार दिवस उपोसथाचे पालन करावे. आपण जेव्हा उपाशी असतो तेव्हा जठरातील परपोषी जीव शरीरात शिल्लक असणारे अन्नकण खावुन टाकतात. यामुळे आपले पाचनतंत्र छान राहते. अतिरीक्त भोजनामुळे चर्बी वाढणे, लठ्ठपणा वा अन्य व्याधि होतात. ते यामुळे नियंत्रणात राहतात.

आहार विषयक अशी काळजी घेतली की आपले कायीक व मानसिक आरोग्य चांगले राहते. आरोग्य परमा लाभा । आरोग्य हेच परम लाभ आहे. त्याचा सांभाळ करणे आपले कर्तव्य आहे.

भवतु सब्ब मंगलम् ।

सौजन्य : विभा विजय भगत, बी.एड.प्रथम वर्ष
(सत्र २०१७-१९)

संत गाडगेबाबा

हाती घेऊन झाडु, झाडत होते गाव ।।२।।
खरा संत होते डेबुजी त्यांचे नाव

फाटक्या तुटक्या कपड्यात डोक्यावर गाडगे घेऊन ।।२।।
समाज कार्य सुरु होत हातावर भाकर खाऊन

किर्तन भजन करत ते गावो गावी फिरत ।।२।।
स्वच्छतेचे महत्व जनतेला समजावत

थकत नव्हते जराही अनवाणी जरी फिरुन ।।२।।
मधुर वाणीने सर्वांना घेतलं आपलंस करुन

अंधश्रद्धा निर्मुलनाचा घेतला होता ध्यास ।।२।।
मुर्तित नसे देव म्हणे असतो माणसात

स्वतः नाही शिकले पण चांगले होते तत्व ।।२।।
प्रबोधनात सांगत होते ते शिक्षणाचे महत्व

जातांनाही ते एक इतिहास घडवुन गेले ।।२।।
मंदिर बांधु नका माझे ही शपथ देऊन गेले
जन सेवा हीच ईश्वर सेवा
हा संदेश देऊन गेले

आणि संत जगा वेगळे माझे गाडगे बाबा
होऊन गेले ।।२।।

छात्रअध्यापक :- सोमेश्वर वामनराव राठोड
प्रथम वर्ष

नियमित शिक्षण स्नातक

छात्र संसद २०१६-२०१८

१)	निलेश राठोड	-	वर्ग प्रतिनिधी (पुरुष)
२)	सुचिता डवले	-	वर्ग प्रतिनिधी (महिला)
३)	सुवर्णा पारखी	-	क्रिडा प्रतिनिधी
४)	लखन चव्हाण	-	क्रिडा प्रतिनिधी
५)	प्रियदर्शनी तायडे	-	सांस्कृतिक प्रतिनिधी
६)	पुनम खडसे	-	सांस्कृतिक प्रतिनिधी
७)	रजनी लांजेकर	-	प्रसिद्धी प्रमुख
८)	शिवम राठोड	-	प्रसिद्धी प्रमुख

प्रा.डॉ.विठ्ठल घोनशेटवाड
संसद प्रभारी प्राध्यापक

नियमित शिक्षण स्नातक

छात्र संसद २०१७-२०१९

१)	हरीप्रसाद नंदकुमार चव्हाण	-	विद्यापीठ प्रतिनिधी
२)	राहुल विठ्ठलराव गेडाम	-	वर्ग प्रतिनीधी (पुरुष)
३)	अंकिता प्रशांत गावंडे	-	वर्ग प्रतिनिधी (महिला)
४)	वसुधा भिमराव जगताप	-	क्रिडा प्रतिनिधी
५)	अभिषेक मोहन राठोड	-	सांस्कृतिक प्रतिनीधी
६)	निकीता बाबाराव जाठे	-	वांड्मय प्रतिनीधी
७)	प्रांजल उमेशराव निमकर	-	प्रसिद्धी प्रमुख

प्रा.डॉ.विठ्ठल घोनशेटवाड
संसद प्रभारी प्राध्यापक

क्रीडा अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय यवतमाळ क्रीडा विभागातर्फे आंतरवर्गीय स्पर्धाचे आयोजन दि.०३.०४.२०१८ ते ०४.०४.२०१८ या दरम्यान घेण्यात आले. या क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन दि.०३.०४.२०१८ ला. सकाळी ९ वाजता घेण्यात आले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिमा लिंगायत मॅडम यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर स प्रक्षिणार्थ्यांनी लेझीम योगा व एरोबिक्सच्या कवायती घेण्यात आल्या. यावेळी सर्वप्राध्यापक वृंद व मान्यवर उपस्थित होते. उद्घाट कार्यक्रमाचे संचालन अभिषेक राठोड प्रास्ताविक प्रतिमा थुल व आभार वसुधा जगताप यांनी केले.

या क्रीडा स्पर्धामध्ये सांघिक व वैयक्तीक खेळाचा समावेश करण्यात आला. त्यात व्हॉलीबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन एथलेटीक्सच्या स्पर्धा घेण्यात आल्या. एथलेटीक्समध्ये १०० मीटर, गोळाफेंक, थाळीफेक, भालाफेक इत्यादि स्पर्धा घेण्या आल्या.

दि.०४.०४.२०१८ ला क्रीडा समारोपाचे आयोजन करण्यात आले. सर्व प्रशिक्षणार्थ्यांना क्रीडा प्रमाणपत्राचे मान्यवरांच्य हस्ते वितरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.प्रा.इंगोले सर , डॉ.घोनशेवाड सर, प्रा.प्रतिमा थुल व बी.एड च प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

प्रा.प्रतिमा थुल
मार्गदर्शक

डॉ.दा.भो.इंगोले सर
प्रभारी प्राध्यापक

रक्तदान शिबीर अहवाल

दिनांक : ०८.०३.२०१८ ला जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन रक्तदान शिबीर घेण्यात आले. प्रसंगी रक्तदान श्री.राहुल गेडाम २) श्री. अभिषेक राठोड ३)कु.वसुधा जगताप ४) कु.सुवर्णा पारखी ५) सय्यद जहिर खान ६) योगीता गा ७)निलेश राठोड ८) मनिषा बोबडे यांनी स्वेच्छेने रक्तदान केले.

श्री.मोमीन दुगे, श्री.राहुल भोयर, श्री.विकास जाधव, सुर्यवंशी, कु.शिवानी यांनी सहकार्य केले.

डॉ.डी.बी.इंगोले
प्रभारी प्राध्यापक

पाथ्रडदेवी एक दिवसीय शिबीर अहवाल

दिनांक ०२/०२/२०१८ ला सकाळी ठिक ८.३० वाजता. प्रथम वर्षाचे विद्यार्थी व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी असे एकुण विद्यार्थी प्राथ्रडदेवी करीता रवाना झाले. जाण्याकरीता व येण्याकरीता खासगी गाडीचा वापर करण्यात आला होता. सदर शिबीर समित्या मार्फत काम केले. प्रवास समिती, भोजन समिती, स्वच्छता समिती, प्रथमोपचार समिती इ. समित्या गठीत करुन समितीला एक प्राध्यापक व विद्यार्थी नेमण्यात आले होते. महिला प्रतिनिधी म्हणुन डॉ.उपाध्ये व डॉ.महाले यांनी व पुरुष प्रतिन म्हणुन प्रा.डॉ.इंगोले विभाग प्रमुख म्हणुन काम पाहिले विद्यार्थी प्रतिनिधी म्हणुन कु.डवले कु.सुवर्णा पारखी श्री.शिवम रा श्री.लखन चव्हाण यांनी जबाबदारी संभाळली.

पाथ्रडदेवी येथे सकाळी १०.०० वाजता. पोहोचले व कार्यक्रमाच्या उद्घाटनाची तयारी केली. सकाळी ११ वाजता. पाथ्रड देवी येथील सरपंचा श्रीमती जाधवबाई उपसरपंच, सदस्य गण व गावकरी व प्राध्यापक यांचे हस्ते उद्घाटन सो पार पडला. संत गाडगे बाबा यांचे प्रतिमेला हार अर्पण करुन गीत सादर केले.

महाविद्यालयाच्या वतीने ग्रामपंचायत सरपंच श्रीमती जाधव बाई यांचे डॉ.महाले व डॉ.उपाध्ये यांचे हस्ते शाल व श्रीफळ गुच्छदेवुन त्यांचा सन्मान करण्यात आला. व शेवटी मान्यवरांचे मार्गदर्शन झाले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर परिसर अवलोकन व ग्रामसफाई, तसेच समाज प्रबोधनपर पथनाट्य करण्यात आले. त्यानंतर पर्यावरण अवलोकन व पक्षी निरीक्षण केले. तसेच प्रकल्पाला भेट दिली. दुपारी ०२.१५ वाजता. सहभ घेण्यात आले. दुपारी ३.३० मिनीटांनी गावकऱ्या सोबत मुलाखती मौखिक घेण्यात आल्या शेवटी ०४.०० वाजता. सर्व विद्य प्राध्यापक यवतमाळ करीता रवाना झाले.

डॉ. डी. बी. इंगोले
आयोजक

कार्यानुभव कार्यशाळा अहवाल

दि.१२/०४/२०१८ ला कार्यानुभव कार्यशाळेचे उद्घाटन डॉ.उपाध्ये यांचे हस्ते झाले. प्रसंगी तज्ज्ञ म्हणु श्रीमती.कमळे, व हेमलता कांबळे यांच्या मार्गदर्शना खाली विविध साहित्य तयार केली व दिनांक १७/०४/२०१८ ला तयार केलेल्या साहित्याची प्रदर्शनी भरविण्यात आली. प्रदर्शनीचे उद्घाटन डॉ.लिंगायत मॅडमनी केले. व सर्व प्राध्यापक कर्मचारी यांनी प्रदर्शनीचे अवलोकन केले. अशा प्रकारे कार्यशाळा उत्साहात पार पडली.

प्रा.डॉ.दा.भो.इंगोले
प्रभारी प्राध्यापक

विज्ञान मंडळ अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ येथे शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये विज्ञान विषय मंडळाची स्थापना रण्यात आली. या उद्देशाने विद्यार्थ्यांमध्ये उपक्रमशीलता वाढविणे, वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे, विद्यार्थ्यांच्या जनशीलतेस वाव देणे, विद्यानाचे व्यावहारीक उपयोजन समजावुन देणे या उद्देशाने विज्ञान विषय मंडळाची स्थापना करण्यात ली.

* विज्ञान मंडळाची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे.

प्राचार्य	डॉ.सिमा सुरेश लिंगायत	–	अध्यक्ष
सह.प्राध्यापक	डॉ.सुषमा मुकुंद गणोले	–	मार्गदर्शक
बी.एड.द्वितीय वर्ष	कु.सुवर्णा शंकर पारखी	–	कार्याध्यक्ष
बी.एड.प्रथम वर्ष	कु.वसुधा भिमराव जगताप	–	कोषाध्यक्ष
बी.एड.प्रथम वर्ष	राहुल विठ्ठल गेडाम	–	सचिव
बी.एड.प्रथम वर्ष	प्रांजल निमकर	–	प्रसिद्धी प्रमुख
बी.एड.द्वितीय वर्ष	निलेश मदन राठोड	–	सदस्य
डी.एड.प्रथम वर्ष	योगिता निमजे	–	सदस्य
	मनिष खवले	–	सदस्य

